

# मनोगत

'विवेकाचे दुसरे नाव विचार आहे' हे पुस्तक वाचकांच्या हाती सुपूर्त करताना मला अतिशय आनंद होत आहे. मला कर्तव्यपूर्तीचे समाधान वाटत आहे.

या पुस्तकाच्या शीर्षकामध्ये दोन महत्त्वाचे शब्द आहेत. एक आहे 'विवेक'. विवेक म्हणजे सारासार विचार करण्याची बुद्धी आणि दुसरा शब्द आहे 'विचार'. विचार म्हणजे जीवनात येणारे भाव आणि त्या भावांचं शब्दांकन. माझ्या मते हे भाव येणं, त्याचं शब्दांकन होणं, त्याचा एक विचार होणं तो सुविचार होणं किंवा कुविचार होणं या सगळ्या प्रक्रियेमध्ये मन, बुद्धी, साधना, परिस्थिती आणि त्या परिस्थितीला तोंड देताना झालेल्या सगळ्या कृती यांच्यातून तो विचार हा एखाद्या भूकंपाप्रमाणे, एखाद्या ज्वालामुखीप्रमाणे, एखाद्या मंथनातून आलेल्या हलाहल विषाप्रमाणे किंवा त्याच मंथनातून बाहेर पडणाऱ्या अमृताप्रमाणे असू शकतो. विचार ही कोणाचीही मक्तेदारी नाही. हा विचार मी केला आणि त्याच्यावर मी माझं स्वामित्व दाखवू शकतो अशा प्रकारचा हा विचार नाही. एखादा विचार करतो, एखादा तो सुविचार लिहितो कदाचित त्या व्यक्तीला त्या सुविचाराची त्याच्या जीवनात अंमलबजावणी करता येत नाही; पण दुसरा एखादा त्या विचारावर अंमलबजावणी करू शकतो, तिसरा एखादा त्याचं मर्म स्वीकारून ते विचार म्हणजे धन समजून त्याच्यामध्ये आयुष्याचं मार्गक्रमण करू शकतो. त्यामुळे विचार ही कोणाही एकाची मक्तेदारी नाही. या पुस्तकात मी मांडलेले जे काही विचार आहेत, हे विचार कोणीही अमलात आणू शकतात. मला किंवा कोणालाही त्याबद्दल श्रेय देण्याची गरज नाही. त्यात आणखी सुधारणा तुम्ही करू शकता. त्याच्यात काटछाट करू शकता.

लहानपणी आमच्या कॉलेजच्या निवडणुकीच्या वेळी एक वाक्य लिहिलेलं होतं 'Those who are good, we are good. Those who are bad, Still we

are good, because our ultimate aim is good.' तसंच जीवनात प्रत्येकाने काहीतरी ध्येयं ठेवावं, भले ते कोणत्याही स्वरूपाचं असेल. त्या ध्येयासाठी त्यानं धडपड करावी आणि ही धडपड करत असताना त्याने जास्तीत जास्त चांगलं वागण्याचा प्रयत्न करावा; आणि असा प्रयत्न करताना रामासारखा चौदा वर्षं किंवा पांडवांसारखा बारा वर्षं वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास सहन करूनही तुम्हाला जर असं वाटत असेल की, समोरचा माणूस योग्य नाही, तर खुशाल युद्ध करावं, न डगमगता! त्यावेळेस तुमच्या तपश्चर्येला फळ येईल. कोयीपासून आंब्याच्या झाडाची उत्पत्ती होऊन त्याला फळ येईपर्यंतचा काळ आपण लक्षात घेतला पाहिजे आणि मगच हे आंबारूपी फळ मिळणार आहे, हे लक्षात घेतलं पाहिजे.

जीवन हे रहाटगाडगं आहे; आणि या रहाटगाड्याला जी एक ऊर्जा लागते, प्रेरणा लागते तो म्हणजे 'विचार' आहे. एकाच दिशेने सगळ्यांनी विचार केल्यानंतर ती गोष्ट होऊ शकते हे अनेक उदाहरणांतून दिसू शकतं. शिवाजी महाराजांच्या काळात मूठभर मावळ्यांना मोठा विजय मिळवणं हे केवळ त्यांच्या एकवटलेल्या विचारांमुळेच शक्य झालं. अशी तुम्ही अनेक उदाहरणं देऊ शकता. जेव्हा सारा समाज एका विचाराने झपाटलेला असतो, एकवटलेला असतो, तेव्हाच 'क्रांती' घडते. आज अनेक लोकांशी चर्चा करताना असं वाटतं की, समाज काही ठिकाणी थोडासा दबलेला आहे, काही ठिकाणी असंतोष आहे. काहींना असं वाटतं की काहीतरी चुकीचं घडत आहे. कोणी म्हणतं की, पूर्वीचं ब्रिटिशांचं राज्य बरं होतं. कोणी म्हणतं की, किती भ्रष्टाचार वाढला आहे, कोणी म्हणतं सरळ परदेशात जाऊन राहावं. अशा प्रकारचे विचार पुढे येत आहेत आणि त्याचबरोबर समाजात अस्थिरता दिसत आहे. अशावेळी एखादा विचार पटत नसेल तर त्याच्या विरोधात बंड करण्याची प्रवृत्ती पण दिसते; म्हणून हे लक्षात ठेवलं पाहिजे की, माणसाचं माणूसपण आहे ते विचारांमुळे आहे; आणि हा विचार सद्विवेक बुद्धीपूर्ण असला पाहिजे, हा या पुस्तकाचा गाभा आहे.

या पुस्तकात समाजाच्या महत्त्वाच्या प्रश्नांबद्दल उपायात्मक विचार मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे; हा प्रयत्न परिपूर्ण असेल असं मी समजत नाही त्यात सुधारणा करण्यास वाव आहे. परंतु, आपला समाज आदर्श करण्याच्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, हे महत्त्वाचं आहे. हे पुस्तक लिहिताना पूर्वीचे विचार, आताचे विचार, 'जुनं ते सोनं' किंवा पुरोगामी विचार असं कोणत्याही प्रकारंच स्वरूप न देता समाजाच्या सध्याच्या गरजेनुसार शिस्त, स्वच्छता, सुसूत्रपणा आणि पारदर्शीपणा कसा असला पाहिजे हे मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे, त्याचा फायदा संपूर्ण समाजाला व्हावा हीच मनोमन इच्छा आहे. या पुस्तकाद्वारे समाजाचं जास्तीत जास्त कसं भलं

होऊ शकेल या विचाराची प्रक्रिया समाजात सुरू व्हावी हाही हे पुस्तक लिहीण्यामागचा उद्देश आहे. मध्यंतरी एका थोर गृहस्थांची भेट हास्यक्लबमध्ये झाली होती. त्यांनी सांगितलं की, माणसाने आयुष्यात एखादं पुस्तक लिहिलं पाहिजे, एखादा ग्रंथ लिहिला पाहिजे. आपल्याला आलेले अनुभव, सुचलेले विचार हे समाजापुढे येण्याची गरज आहे. आपण केलेली तपश्चर्या एखाद्या स्वरूपात आपण समाजासमोर मांडू शकतो, त्यामुळे समाजाला त्यात आणखी काम करण्याची इच्छा होऊ शकते. त्यामुळे ते काम अधिक सहजतेने, अधिक सुंदरतेने होऊ शकतं. जसं एखादा संशोधक एखाद्या टप्प्यापर्यंत संशोधन करतो, नंतर आणखी एखादा संशोधक त्यावर आणखी काम करून ते परिपूर्णतेकडे नेण्याचा प्रयत्न करतो, त्याप्रमाणेच विचारांचं आहे.

हे पुस्तक का लिहावसं वाटलं, त्यामागे दोन गोष्टी आहेत. मी पशुवैद्यकीय महाविद्यालयात पहिल्या वर्षात शिकत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक स्वयंसेवक अनंतराव देवकुळे पुढे महाराष्ट्राचे प्रांत संघचालक झाले होते ते माझ्या सत्यव्रत कुलकर्णी नावाच्या मित्राकडे आले होते. त्यांनी त्याला विचारलं, की तुझ्या वर्गात पहिला आलेला विद्यार्थी कोण आहे, त्याने त्यांना माझं नाव सांगितल्यानंतर ते मला भेटायला सकाळी ६ वाजता होस्टेलवर माझ्याकडे आले. मी व माझे रूम पार्टनर झोपलेलो होतो. त्यांनी दरवाजा वाजवला. मी दरवाजा उघडला. मी 'काय कटकट' या आविर्भावात डोळे चोळत होतो. कुलकर्णी त्यांच्याबरोबर होता. त्याने माझ्याकडे निर्देश केला. हाच तो विद्यार्थी. त्यांनी मला पहिलाच प्रश्न विचारला, 'तू जगतोस कशासाठी?' मी नुकताच झोपेतून उठलो होतो, मला काही सुचेना त्यावेळेस मला वाटलं, आम्ही नुकताच 'मुकद्दर का सिकंदर' हा सिनेमा पाहिला होता. अमिताभ बच्चन आमचा हिरो होता. त्या चित्रपटाचा काही प्रभाव असेल म्हणा, मी उत्तर दिलं, 'मरण्यासाठी जगतो' ते क्षणभर थांबले आणि विचारलं, 'तुझं नाव काय?' मी म्हटलं 'विवेक'. ते मला म्हणाले 'बाळा, विवेकासाठी जग' आणि तरातरा निघून गेले.

या प्रसंगातून मला हेच सांगायचंय की, त्या गृहस्थांनी मला एक विचार दिला, एक प्रेरणा दिली. अशी प्रेरणा की, आयुष्यात आपल्याला अनेक 'टर्निंग पॉईंट' मिळू शकतात. मी व्हेटर्नरी डॉक्टर कसा झालो, मग सहकारात कसा आलो, एम.डी. कसा झालो. अनेक अनेक टर्निंग पॉईंट्स, अनेक लोकांचे आशीर्वाद, अनेक लोकांचे सद्विचार हे आपल्याला प्रेरणादायी ठरतात. लोकांना आलेले अनुभव लक्षात घेता आपण त्या काट्याकुट्याच्या वाटेला जात नाही. आपल्या अनुभवांच्या आधारावर पुस्तक लिहीण्याचा विचार अधूनमधून यायचा. आता आयुष्याच्या उतरणीच्या या टप्प्यावर

आपण असं पुस्तक लिहू शकतो असा विश्वास वाटल्याने मी हा प्रयत्न केला.

दुसरी प्रेरणा देणारी गोष्ट म्हणजे भगवद्गीता. माझ्या जीवनात भगवद्गीतेला सगळ्यात मोठं स्थान आहे. गीतेच्या नियमित वाचन पठणातूनच मला हे विचार सुचले असं मी मानतो.

हे पुस्तक सिद्ध करण्यास ज्यांनी मला मदत केली ते माझे मित्र नरेंद्र राजगुरव व भरत भायगुडे आणि ज्यांच्यामुळे हे पुस्तक साकार झालं ते माझे मित्र व या पुस्तकाचे प्रकाशक गौतम कोतवाल या सगळ्यांचा मी ऋणी आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचं देखील एक वैशिष्ट्य आहे. मी २०१२ मध्ये चीनमध्ये गेलो असताना तिथे एका मॉलच्या बाहेर काही चिनी चित्रकार बसलेले होते. त्यांना आपण इंग्रजीमध्ये नाव लिहून द्यायचं आणि त्यांनी त्या नावावर चित्रं काढायचं, असा तो प्रकार होता. चित्र मला इतकं भावलं की ते मी घरी फ्रेम करून लावलं आहे. त्या चित्रामध्ये 'विवेक' या नावाचा विचार चित्रकाराने मांडला आहे, म्हणूनच ते चित्रं या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर घेतलं आहे, त्या चित्रकाराचाही मी ऋणी आहे.

वाचकांनी हे पुस्तक वाचावं, त्यात काही दोष असतील तर मला माफ करावं, काही चांगल्या गोष्टी असतील तर त्या स्वीकाराव्यात. ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या पसायदानाप्रमाणे किंवा सद्गुरू वामनराव पै यांनी म्हटल्याप्रमाणे 'हे सगळं विश्व सुखी व्हावं' हीच परमेश्वर चरणी प्रार्थना !

**डॉ. विवेक क्षीरसागर**

निवास : फ्लॅट नं. २, प्लॉट नं. ९, सांदीपनी बिल्डींग
राघवनगर को-ऑप. हौ. सोसायटी, राघवनगर,
धनकवडी, पुणे - ४११ ०४३ फोन - ०२० - २४३७०७८६
मो.९९७००६६७८६ email : hpkvivek@gmail.com
website : www.neerksheerviveketu.com

कार्यालय : कार्यकारी संचालक, पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, मर्यादित
कात्रज डेअरी, पुणे-सातारा रोड, कात्रज, पुणे ४११ ०४६.
फोन : ०२० - २४३७०६९७, २४३७३४५३
फॅक्स : ०२०- २४३७४८३४ email : katraj@sify.com
website : www.katrajdairy.com